मंत्रालयीन विभागातील वरिष्ठ स्वीय सहायकांची
दिनांक ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः साजेसू-२३२६/प्र.क्र. ४६/प्रशा-३**
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २८ एप्रिल, २०२६

## शासन परिपत्रक

मंत्रालयीन विभागातील वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची (दि.१.१.२०२५ ते ३१.१२.२०२५ या कालावधीत नियमित पदोन्नतीने नियुक्ती झालेल्या वरिष्ठ स्वीय सहायकांची) तयार करण्यात आली असून, ती या परिपत्रकासोबत जोडण्यात आली आहे (विवरणपत्र-अ). सदर ज्येष्ठतासूची सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना दिनांक २१.०६.२०२१, “महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१” मधील तरतूदींचा अवलंब करुन तयार करण्यात आली आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, वरिष्ठ स्वीय सहायकांची प्रस्तुत दिनांक ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची आपल्या विभागातील वरिष्ठ स्वीय सहायक संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांच्या (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांसह) निदर्शनास आणावी. तसेच यासंदर्भात संबंधित वरिष्ठ स्वीय सहायकांकडून आक्षेप/त्रुटी याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनातील मुद्यांबाबतची माहिती विभागातील अभिलेखानुसार तपासून विभागाच्या अभिप्रायांसह निवेदने या विभागाकडे दिनांक **१२.०५.२०२६** पर्यंत पाठवावीत. विहित कालावधीत आक्षेप/माहिती प्राप्त न झाल्यास ज्येष्ठतासूचीत नमूद केलेला तपशील बरोबर असल्याचे गृहित धरुन अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येईल.

३. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या आदेशाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधीन राहून सदर ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येत आहे.

४. सदर शासन परिपत्रक व ज्येष्ठतासूची महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संकेतांक २०२६०४२८१६५५४९५३०७ हा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAJANAN SAHADEO PARAB

Digitally signed by GAJANAN SAHADEO PARAB
DN: CN = GAJANAN SAHADEO PARAB, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = GENERAL ADMINISTRATION DEPT
Date: 2026.04.28 16:57:47 +05'30'

**( ग. स. परब )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**सोबत: विवरणपत्र-अ**

प्रत,

१) संबंधित मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
२) निवड नस्ती/संग्रहार्थ (कार्यासन प्रशा-३)

(शासन परिपत्रक क्रमांकः साजेसू-२३२६/प्र.क्र.४६/प्रशा-३, दि. २८.०४.२०२६ सोबतचे विवरणपत्र)

## विवरणपत्र - अ

संवर्गाचे नांव - वरिष्ठ स्वीय सहायक

वेतनश्रेणी - (एस-२४ : ७११००-२११९००)

दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची ( दि.१.१.२०२५ ते ३१.१२.२०२५ या कालावधीत नियमित पदोन्नतीने नियुक्ती झालेल्या वरिष्ठ स्वीय सहायकांची )

| अ.क्र. | नियम ३ (२) (ब) नुसार ज्येष्ठता क्रमांक | श्री/ श्रीमती | वरिष्ठ स्वीय सहायकांचे नांव | मराठी/ इंग्रजी | प्रवर्ग | विभागाचे नांव | जन्मदिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | संबंधित पदावरील नियुक्तीचा मार्ग | पदोन्नती आदेशाचा दिनांक | नियम ३ (२)(अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रुजू दिनांक | ज्येष्ठतेचा/ नियमित पदोन्नतीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | १ | श्रीमती | अंकिता अनिल प्रभू | मराठी | विमाप्र | वित्त विभाग | ०५.०२.१९७१ | २८.०२.२०२९ | पदोन्नती | ०१.०८.२०२५ | ०३.१०.२०२५ | ०१.०८.२०२५ | |
| २ | २ | श्रीमती | माधुरी आनंद तेलंग | मराठी | अजा | साप्रवि | ११.०१.१९७४ | ३१.०१.२०३२ | पदोन्नती | ०१.०८.२०२५ | ११.०८.२०२५ | ०१.०८.२०२५ | |
| ३ | ३ | श्री | दत्ता भोटू राठोड | मराठी | विजा(अ) | गृह विभाग | ०७.०७.१९६८ | ३१.०७.२०२६ | पदोन्नती | ०१.०८.२०२५ | ०१.०८.२०२५ | ०१.०८.२०२५ | |